**सरकारतर्फे साक्षीदार क्र.०१ चा शपथेवर जबाब –**

माझे नाव – प्रविण विठ्ठल सागर

माझे वय – ३४ वर्षे व्यवसाय –जवान, राज्य उत्पादन शुल्क, श्रीरामपुर

राहाणार – कल्याण रोड, अहमदनगर.

**सरतपास विधीज्ञ श्री.एस.पी.तडके यांचे मार्फत शपथेवर सुरु** –

१. घटना ही दिनांक ०७.०१.२०२३ रोजी घडली. त्यावेळी निरीक्षक राख साहेब यांना गुप्त बातमीदारा कडुन माहिती मिळाली की उषा पवार नावाची महिला तिचे राहाते घरी गावठी हातभट्टी दारू तयार करित होती. त्यानंतर राख साहेबांनी आम्हाला बातमी सांगितली. मी, राख साहेब व इतर कर्मचारी असे सर्वजण खाजगी वाहनाने पवार वस्ती, निमगाव वाघा येथे गेले. त्याठिकाणी साहेबांनी दोन पंचांना बोलावुन घेवुन त्यांना बातमीबाबत सांगितले आणि पंचनामाकरिता सोबत येण्यास सांगितले. त्यानंतर आम्ही सर्वजण घटनास्थळावर गेलो. त्याठिकाणी एक महिला हातभट्टी दारू तयार करतांना मिळुन आली. तिच्या घराच्या पाठीमागे हातभट्टी दारू तयार करण्यासाठी चुल बनविली होती आणि त्यावर ती हातभट्टी दारू तयार करत होती. त्यानंतर साहेबांनी त्या महिलेस स्वत:ची व इतर कर्मचारी व पंचांची ओळख करून दिली. त्यानंतर तिला तिचे नाव गाव विचारले असता तिने तिचे नाव उषा नाथा पवार, वय ४५ वर्षे, रा. पवार वस्ती, निमगाव वाघा, ता.जि.अहमदनगर असे सांगितले.

२. त्यानंतर आम्ही सर्वांनी मिळुन त्याठिकाणी पाहणी केली असता ६ प्लास्टीकच्या टाक्यांमध्ये १४०० लिटर रसायन आणि ३५ लिटर मापाच्या ६ कॅनमध्ये २०० लिटर गावठी दारू व जर्मन धातुचे थावर चाटुनळीसह मिळुन

आले. त्याची अंदाजे किंमत रूपये ४८,५००/– होती. त्यातुन १८० मि.ली.च्या काचेच्या दोन बाटल्या रासायनिक तपासणीकरिता रसायन आणि गावठी दारू वेगळे काढले. उर्वरित मुद्देमाल जागीच नाश केला. पंचांसमक्ष दिसत्या परिस्थितीचा पंचनामा माझे समक्ष तयार केला. आरोपीला कलम ४१ प्रमाणे नोटीस देवुन सोडुन दिले. त्यानंतर कार्यालयात येवुन फिर्याद दिली. फिर्याद आता मला दाखविली. ती तिच असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्याला **नि.क्र.२८** देण्यात आली. मला आता प्रथम खबरी अहवाल दाखविला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२९** देण्यात आली. आरोपीला पाहिल्यास ओळखु शकतो. आज आरोपी न्यायालयात हजर नाही.

सरतपास पुर्ण.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.के.आर.कोतकर यांचेतर्फे सुरू –</u>**

३. हे म्हणणे खरे आहे की, मिळालेल्या गुप्त बातमीची बनावट ग्राहक पाठवुन खात्री केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, पंचांची नावे फिर्यादीत नमुद नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, वेगवेगळया ठिकाणी छापा टाकलेल्या प्रकरणातील मुद्देमाल पोलीस ठाण्यात जमा असतो. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादच्या डाव्या बाजुला कोणताही शेरा नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाच्या आजुबाजुला घरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझे फिर्यादीत छापा टाकण्याकरिता कुठल्या वाहनाने गेले ते नमुद नाही. आम्हाला छाप्याच्या कारवाई बाबत लेखी आदेश नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, या प्रकरणातील पंच हे आमचे नेहमीचेच पंच आहेत.हे म्हणणे खरे नाही की, पंचनामा कार्यालयातच

तयार केला. हे म्हणणे खरे आहे की, नमुना घेण्याकरिता बाटल्या कोठुन आणल्या हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात खोटी माहिती सांगितली. हे म्हणणे खरे नाही की, अशी कोणती घटना घडली नाही आणि आरोपी तेथे मिळुन आली नाही, आरोपीकडुन कोणताही मुद्देमाल जप्त केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचा आधार कार्डवरिल फोटो पाहुन मी आरोपीला ओळखु शकतो असे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, वरिष्ठांच्या सांगण्यावरून मी आज खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

**साक्षीदाराचा जबाब नोंदवितांना डायसलगतचे स्क्रीन व भिंतीवरील स्क्रीन चालु केले होते व त्यांचे समक्ष संगणकावर साक्ष नोंदवण्यात आली.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

जबाब माझे समक्ष व उपस्थितीत नोंदवला.

सही/-

(माधुरी रा.खनवे)

दिनांक १७/१०/२०२५ अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,

कोर्ट नं.०५, अहमदनगर.